पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. ३**
**सभावृत्तांत**

दिनांक :- ०३/१०/२०१७

वेळ :- दु. १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ०३/१०/२०१७ रोजी दु. १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.सचिन बाजीराव चिंचवडे — अध्यक्ष
२. मा. प्रज्ञा महेश खानोलकर
३. मा. संगिता राजेंद्र भोडवे
४. मा.नामदेव जनार्दन ढाके
५. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.सुरेश शिवाजी भोईर
८. मा.अपर्णा निलेश डोके
९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे पाटील
१०. मा.राजेंद्र तानाजी गावडे
११. मा.निता विलास पाडाळे
१२. मा.उषा दिलीप काळे
१३. मा.संतोष अंकुश कोकणे

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदिप खोत – क्षेत्रिय अधिकारी ब क्षेत्रीय कार्यालय, मा.रविंद्र जाधव - प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.देवण्णा गटटुवार, - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा. एकनाथ पाटील – प्र. कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.डॉ.सतिश गोरे – पशुवैदयकिय अधिकारी , मा.एम.एम.इनामदार, लेखाधिकारी , ब क्षेत्रीय कार्यालय , मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य , मा..सी.एन.धानोरकर – स्थापत्य विभाग, मा.एच.पी.बन्सल – उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.भाऊसाहेब साबळे – उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग मा.अहिरे एस.एन. - उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग ,,मा.आर.एस.पवार – उपअभियंता जलनिसारण विभाग मा.भागवानी सुनिल – उपअभियंता, नगररचना विभाग, श्री.के.डी.दरवडे – सहा.आरोग्याधिकारी, मा.के.बी.पारोल मुख्य आरोग्य निरिक्षक, श्री.एस.एस.शिंदे – सर्व्हेअर , नगररचना व विकास, श्री.तावरे – कनिष्ठ अभियंता, नगररचन विकास विभाग इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष श्री.सचिन बाजीराव चिंचवडे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

**तदनंतर उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३ चिंचवड येथे आरोग्य कोठी शेजारील मोकळया जागेत अस्वच्छता असते तेथे कचरा राडारोडा टाकला जातो. त्यामुळे स्वच्छतेच्या दृष्टीने सार्वजनिक वाचनालय उभारुन त्यास नवतरुण मंडळ चिंचवडगांव सार्वजनिक वाचनालय असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४ चिंचवड येथे श्री मोरया गोसावी क्रिडासंकुल विकसित करण्यात आले त्यावेळी त्या परिसरातील जागा या महापालिकेच्या विकासकामांना डांगे कुटूंबातील महादेव (नाना) गुणाजी डांगे यांचे नावाने दिलेल्या आहेत. तरी महादेव उर्फ नाना डांगे चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५ चिंचवड येथे पवना नदीवर पवित्र असा घाट आहे. या ठिकाणी दररोज अनेक दशक्रिया विधी पार पडतात त्या ठिकाणी हिंदू धर्म शास्त्राप्रमाणे अंघोळ करुन विधी कराव्या लागतात. हे विधी सकाळच्या वेळेत होत असल्यामुळे थंडीच्या दिवसात गरम पाण्याची सोय होण्यासाठी स्नान गृहावर सोलर वॉटर हिटर बसविणेबाबत नागरीकांची मागणी असल्यामुळे त्या ठिकाणी सोलर वॉटर हिटर बसविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अश्विनी गजानन चिंचवडे—पाटील यांचा प्रस्ताव..

विषय क्र.६ माजी नगरसेवक यांचे संपर्क कार्यालय तसेच निवासस्थान दर्शक फलक काढण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७ समर्थ कॉलनी दळवीनगर येथील उदयानाचे कै.पारुबाई दळवी उदयान असे नामकरण तसेच सहारा ६६ सोसायटी समोरली चौकांचे कै.दिलीप कामे चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई यांचा प्रस्ताव. .

विषय क्र.८ प्रभाग क्रमांक १७ मधील वाल्हेकरवाडी गावठण येथील चौकाचा सध्या शिवाजी चौक असे एकेरी नामोउल्लेख प्रचलित आहे. छत्रपती शिवरायांचे कार्य अलौकिक आहे. त्यांच्या नावाचा असा एकेरी उल्लेख होणे शोभनीय नाही म्हणून वाल्हेकरवाडी चौकाचे नामकरण छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.करुणा शेखर चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक १७ वाल्हेकरवाडी येथे भालके परिवाराची जागा असून, साधारण पन्नास कुटूंब तेथे राहतात. तरी सदर जागेला भालके कॉलनी असे नामकरण करणेकामीया प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सचिन बाजीराव चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१० मौजे चिंचवड वाल्हेकरवाडी येथील गावठाणातील १२ मी. विकास योजना रस्ता संपतो तेथून मनपा रुग्णालयापासून शाम वाल्हेकर यांचे घरापर्यंत व तेथून नदीपर्यंतचा ९ मी. रुंदीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये रस्ता घोषीत करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सचिन बाजीराव चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ११ प्रभाग क्रमांक १६ मधील कालनी प्रमाणे बोर्ड बनविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.प्रज्ञा महेश खानोलकर यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. १०
दि. ३/१०/२०१७
सुचक : मा.निता विलास पाडाळे

विषय क्र. १
विभाग – नगररचना व विकास विभाग
अनुमोदक: मा.अश्विनी गजानन चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा.निता विलास पाडाळे यांचा दिनांक १२/९/२०१७ रोजीचा प्रस्ताव

मौजे रहाटणी येथील स.नं.७९ पै. पिंपरी काळेवाडी मुख्य रस्त्यापासून (पाचपीर चौक काळेवाडी) सि.नं.५७९७ व सि.स.नं.५७९५ मधून ९.० मी. रुंदीचा रस्ता असून, तो पुढे ६.० मी.रुंदीचा आहे. सदरचा रस्ता पुढे डावीकडे सि.स.नं..५८३५ लगत झेड आकारात दर्शविला आहे. सदरचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषित करणेत आला आहे. सदरचा झेड आकारातील रस्ता हा ४५ मी. लांबीचा रस्ता हा अस्तित्वातील इमारतींवरुन जात आहे. त्यामुळे सदरचा झेड आकारातील सुमारे ४५ मी. लांबीचा घोषित रस्ता रदद करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ११
दि. ३/१०/२०१७
सुचक : मा.निता विलास पाडाळे

विषय क्र. २
विभाग – नगररचना व विकास विभाग
अनुमोदक: मा.अश्विनी गजानन चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा.निता विलास पाडाळे यांचा दिनांक १२/९/२०१७ रोजीचा प्रस्ताव

मौजे – रहाटणी येथील स.नं.८२ पै. व ८३ पै. मध्ये यापुर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये अन्ड्रो नायगत / विदया चव्हाण यांचे घरापासून ते गुरुनाथ महाशेटटे / तुकाराम जाधव यांचे घरापर्यंत ६.० मी. रुंदीचा रस्ता घोषीत करणेत आलेला आहे. सदर रस्त्याच्या जागेत मोठया प्रमाणात बांधकामे असून, त्यामुळे रस्तारुंदीकरणास जागा मिळण्यास अडचणी आहेत. त्यामुळे सदरचा घोषीत रस्ता रदद करुन त्याऐवजी उत्तर दिशेस स.नं.८३ पै. मध्येच अस्तित्वात असलेल्या विदया चव्हाण / रामचंद्र जाधव व जगदीश राठोड यांच्या घरापासून ते गुरुनाथ महाशेटटे / सुनिल अल्हाट यांचे घरापर्यंतचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषीत करणेकामीचा प्रस्ताव मा.प्रभाग समितीपुढे मान्यतेकामी आला असता त्यास पुढे नमुद केलेप्रमाणे मा.निता पाडाळे यांनी उपसुचना मांडली.

वरील विषयांकित ठरावामध्ये रहाटणी येथील स.नं.८२, ८३ मधील घोषित अन्ड्रो नायगत / विदया चव्हाण यांचे घरापासून ते गुरुनाथ महाशेटटे यांचे घरापर्यंत असलेला ६.०० मी. रुंदीचा रस्ता रदद करणेत यावा. तसेच ठराव क्रमांक ८ मध्ये मंजूर केलेला (सदरचा ठराव मंजूर नसून पुढील सभेच्यावेळी करणेत यावा असे सर्वानुमते मंजूर आहे.) उत्तर दिशेस स.नं.८३ पै. अस्तित्वात असलेला रस्ता घोषित न करता आहे त्या स्थितीतच ठेवणेत यावा याप्रमाणे विषयांकित ठरावात उपसुचनेच्या दुरुस्तीसहच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. .

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्र. १२

दि. ३/१०/२०१७

विषय क्र. ३

विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

अनुमोदक: मा.राजेंद्र तानाजी गावडे

संदर्भ :- मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील यांचा दि. ३/१०/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड येथे आरोग्य कोठी शेजारील मोकळया जागेत अस्वच्छता असते तेथे कचरा राडारोडा टाकला जातो. त्यामुळे स्वच्छतेच्या दृष्टीने सार्वजनिक वाचनालय उभारुन त्यास नवतरुण मंडळ चिंचवडगांव सार्वजनिक वाचनालय असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता त्वरीत कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १३

दि. ३/१०/२०१७

विषय क्र. ४

विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

अनुमोदक: मा.सुरेश शिवाजी भोईर

संदर्भ :- मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील यांचा दि. ३/१०/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड येथे श्री मोरया गोसावी क्रिडासंकुल विकसित करण्यात आले त्यावेळी त्या परिसरातील जागा या महापालिकेच्या विकासकामांना डांगे कुटूंबातील महादेव (नाना) गुणाजी डांगे यांचे नावाने दिलेल्या आहेत. तरी महादेव उर्फ नाना डांगे चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत आहे.

सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता त्वरीत कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १४

दि. ३/१०/२०१७

विषय क्र. ५

विभाग – विदयुत ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

अनुमोदक: मा. राजेंद्र तानाजी गावडे

संदर्भ :- मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील यांचा दि. ३/१०/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड येथे पवना नदीवर पवित्र असा घाट आहे. या ठिकाणी दररोज अनेक दशक्रिया विधी पार पडतात त्या ठिकाणी हिंदू धर्म शास्त्राप्रमाणे अंघोळ करुन विधी कराव्या लागतात. हे विधी सकाळच्या वेळेत होत असल्यामुळे थंडीच्या दिवसात गरम पाण्याची सोय होण्यासाठी स्नान गृहावर सोलर वॉटर हिटर बसविणेबाबत नागरीकांची मागणी असल्यामुळे त्या ठिकाणी सोलर वॉटर हिटर बसविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता त्वरीत कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १५

दि. ३/१०/२०१७

विषय क्र. ६

विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

अनुमोदक: मा. करुणा शेखर चिंचवडे

संदर्भ :- मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई यांचा दि. ३/१०/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणा-या संपुर्ण क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणा-या माजी नगरसेवक यांचे जुने फलक काढणेकामीचा प्रस्ताव मा.प्रभाग समितीपुढे मान्यतेकामी आला असता त्यास मा.राजेंद्र तानाजी गावडे यांनी खाली नमुद केलेप्रमाणे उपसुचना मांडली.

ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणा-या क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणा-या नगरसेवकाच्या नावाचे व कार्यालयाचे मिळून चार बोर्डच असावेत व ते रहदारी व पादचा-या अडचण होत असेल तर ते हलवून योग्य ठिकाणी लावावेत जेणेकरुन रहदारी व पादचा-यांना वापरतांना अडचण होणार नाही या उपसुचनेसह सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता त्वरीत कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १६
दि. ३/१०/२०१७

विषय क्र. ७
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.नामदेव जनार्दन ढाके
अनुमोदक: मा. करुणा शेखर चिंचवडे

संदर्भ :- मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई यांचा दि. ३/१०/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत समर्थ कॉलनी दळवीनगर येथील उदयानाचे कै..पारुबाई दळवी उदयान असे नांव देणेत यावे तसेच प्रेमलोक पार्क बिजलीनगर रस्त्यावरील सहारा ६६ सोसायटी समोरली चौकाला कै.दिलीप कामे चौक असे नाव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १७
दि. ३/१०/२०१७

विषय क्र. ८
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.सुरेश शिवाजी भोईर
अनुमोदक: मा. राजेंद्र तानाजी गावडे

संदर्भ :- मा. करुणा शेखर चिंचवडे यांचा दि. ३/१०/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १७ मधील वाल्हेकरवाडी गावठण येथील चौकाचा सध्या शिवाजी चौक असे एकेरी नामोउल्लेख प्रचलित आहे. छत्रपती शिवरायांचे कार्य अलौकिक आहे. त्यांच्या नावाचा असा एकेरी उल्लेख होणे शोभनीय नाही म्हणून वाल्हेकरवाडी चौकाचे नामकरण छत्रपती शिवाजी महाराज चौक असे आदरार्थी करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानमुमते मान्य झाला.

ठराव क्र. १८
दि. ३/१०/२०१७

विषय क्र. ९
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.सचिन बाजीराव चिंचवडे
अनुमोदक: मा. नामदेव जनार्दन ढाके.

संदर्भ :- मा. सचिन बाजीराव चिंचवडे यांचा दि. ३/१०/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक १७ वाल्हेकरवाडी येथे भालके परिवाराची जागा असून, साधारण पन्नास कुटूंब तेथे राहतात. तरी सदर जागेला भालके कॉलनी असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १९

दि. ३/१०/२०१७

विषय क्र. १०

विभाग – नगररचना व विकास विभाग

सुचक : मा.सचिन बाजीराव चिंचवडे

अनुमोदक: मा. माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

संदर्भ :- मा. सचिन बाजीराव चिंचवडे यांचा दि. ३/१०/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मौजे चिंचवड वाल्हेकरवाडी येथील गावठाणातील १२ मी. विकास योजना रस्ता संपतो तेथून मनपा रुग्णालयापासून शाम वाल्हेकर यांचे घरापर्यंत व तेथून नदीपर्यंतचा ९ मी. रस्ता तातडीने विकसित करणे अत्यावश्यक आहे. वाढती नागरीवस्ती व लोकसंख्या पाहता सदर भागातील रस्ता विकसित होणे गरजेचे आहे

तरी सदर मौजे चिंचवड वाल्हेकरवाडी येथील गावठाणातील १२ मी. विकास योजना रस्ता संपतो तेथून मनपा रुग्णालयापासून शाम वाल्हेकर यांचे घरापर्यंत व तेथून नदीपर्यंतचा ९ मी. रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा चे कलम २०५ अन्वये मनपा रस्ता घोषीत करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला..

ठराव क्र. २०

दि. ३/१०/२०१७

विषय क्र. ११

विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.प्रज्ञा महेश खानोलकर

अनुमोदक: मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई.

संदर्भ :- मा.प्रज्ञा महेश खानोलकर यांचा दि. ३/१०/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ मध्ये १) समर्थ कॉलनी, विकासनगर (मराठी शाळेजवळ) २) औंदुबर कॉलनी, संगिता अपार्टमेंटमागे विकासनगर ३) संगम मित्र मंडळ, भिमाशंकरनगर (किवळे) ४) संगम मित्रमंडळ श्री गणेश मंदिराकडे भिमाशंकरनगर किवळे ५) संगम चौक श्री गणेश मंदिर ( भिमाशंकरनगर किवळे) ६) श्री गणेश मंदिर रोड, भिमाशंकर नगर किवळे ७) गुरुदत्त कॉलनी १, २, ३ कॉलनीचे नांवे टाकणे (जुनवणे वस्ती) ८) दत्तनगरमध्ये अवधुत कॉलनी , त्रिमुर्ती कॉलनी, श्रीपाद कॉलनी, दिगबंर कॉलनी, औंदुबर कॉलनी, वल्लभ कॉलनी, दत्तात्रय कॉलनी, ९) प्रगती कॉलनी A B हनुमान कॉलनी, मधुबन कॉलनी, छत्रपती शिवाजी महाराज चौक, १०) कै.मारुती किसन तरस मार्ग श्रीनगर ११) ब्रम्ह दत्तात्रय कॉलनी, दत्तनगर, सदगुरु कॉलनी, दत्तनगर, १२) कै.सहादु बन्सी तरस चौक, कोतवालनगर किवळे, कॉलनी क्रमांक ४ १३) बापदेव नगर नं.१, २, ३, ४, ५, कॉलनी बोर्ड १४) एकता कॉलनी दत्तनगर, १५) मोरया कॉलनी, सिध्दी विनायक कॉलनी १६) त्रिमुर्ती चौक , साई कॉलनी बोर्ड, संकल्पना बोर्ड असे कॉलन्यांचे बोर्ड बनविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले तदनंतर मा. सचिन बाजीराव चिंचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[सचिन बाजीराव चिंचवडे ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/११६/२०१७.
दिनांक : ३ / ११ /२०१६

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना